आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ मार्च २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- आंतरराष्ट्रीय महिला दिन विविध कार्यक्रमांनी साजरा /महिलाप्रणित विकास या संकल्पनेवर भारताची वाटचाल होत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं सुमारे साडेतेहतीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण आणि पायाभरणी

- महाराष्ट्रात ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेचा प्रारंभ

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा न्यूझीलंडचा निर्णय /भारताची जोरदार फटकेबाजी

**<><><><><>**

जागतिक महिला दिन आज साजरा करण्यात आला. या दिनाची यंदाची संकल्पना “सर्व महिला आणि मुलींसाठी हक्क, न्याय आणि कृती” अशी आहे. जागतिक स्तरावर महिला अधिकारांचं बळकटीकरण,न्याय सुनिश्चितीकरण आणि लिंगसमभावाच्या दिशेनं वेगवान वाटचालीची आवश्यकता यावर भर देण्यात येत आहे.

महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले होते. महिलाप्रणित विकास या संकल्पनेवर भारताची वाटचाल होत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीच्या विज्ञान भवनात भारती :नारी से नारायणी या महिला विचारवंतांच्या राष्ट्रीय संमेलनाच्या समारोप सोहळ्यात त्या बोलत होत्या. विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढत असून त्यांच्या सक्षमीकरणासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे असं त्यांनी सांगितलं. राष्ट्रपतींनी महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यात त्यांनी म्हटलंय …

- - -.. **होल्ड- बाईट- राष्ट्रपती - - -**

महिलांच्या आंतरिक शक्तीमुळे आणि धडाडीच्या वृत्तीमुळे त्यांच्या कुटुंबांचं, समाजाचं आणि देशाचं भवितव्य घडत असल्याचं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

देशाच्या नारीशक्तीच्या कामगिरीचा देशाला अभिमान असून देशाच्या प्रगतीत त्यांच्या परिवर्तनकारी भूमिकेचा मोठा वाटा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं सुमारे साडेतेहतीस हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं लोकार्पण तसंच पायाभरणी झाली.अठरा हजार तीनशे कोटी रुपये खर्चाच्या दिल्ली मेट्रो योजने अंतर्गत दोन मेट्रो मार्गिकांचाही यात समावेश आहे.

देशाच्या राजधानीत पायाभूत सुविधा सातत्याने विस्तारत असून अधिक मजबूत होत असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. आमआदमी पार्टीच्या राजवटीत दिल्लीचा विकास खुंटला होता अशी टीका त्यांनी केली. पश्चिम बंगालमधे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्याच्या वेळी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राष्ट्रपतींचा, संविधानाचा आणि लोकशाहीच्या उज्ज्वल परंपरांचा अपमान केल्याचा आरोप त्यांनी केला. केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री मनोहरलाल तसंच दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता कार्यक्रमाला उपस्थित होते.

दिल्लीच्या सरोजिनीनगर परिसरात बांधलेल्या जीपीआरए वसाहतीला भेट देऊन आज प्रधानमंत्री मोदी यांनी महिला अर्जदारांना त्यांच्या सदनिकेच्या किल्ल्या सुपूर्द केल्या. महिला दिनानिमित्त प्रधानमंत्र्यांनी आज विविध योजनांच्या लाभार्थी महिलांशी संवाद साधला.

<><><><><>

केंद्र सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशन या उपक्रमात राज्य देशात अव्वल असल्याचं केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय आणि रेल्वे मंत्रालयाचे

राज्यमंत्री व्ही. सोमान्ना म्हणाले. ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत आणि मजबूत करण्यासाठी सामुदायिक सहभाग वाढवण्याच्या उद्देशानं सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८ ते २२ मार्च दरम्यान जल महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. उपक्रमासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याला मिळणारा ४०६ कोटी रुपयांचा निधी लवकरच पूर्ण स्वरूपात दिला जाईल. तसंच, येत्या सहा महिन्यात राज्यातल्या सर्व घरांमध्ये नळाद्वारे पिण्याचं पाणी पोहोचवण्याचं काम होईल, तशा सूचना आपण अधिकाऱ्यांना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्या सुरु होत असून तो येत्या २ एप्रिल पर्यंत चालेल. लोकसभेत उद्या सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास प्रस्ताव मांडला जाईल. काँग्रेसचे मोहम्मद जावेद, के सुरेश आणि मल्लू रवी हे तीन सदस्य हा प्रस्ताव मांडतील.

दरम्यान, भाजपा आणि काँग्रेसनं त्यांच्या लोकसभा खासदारांना व्हीप जारी करून, येत्या मंगळवारपर्यंत सभागृहात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मुलींना गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावं यासाठी ९ ते १४ वयोगटातल्या सुमारे ९ लाख ८४ हजार मुलींना एचपीव्ही प्रतिबंधक लस देण्याच्या मोहिमेचा प्रारंभ आज मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला.

जागतिक महिला दिनानिमित्त, सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिला डॉक्टर, शल्यचिकित्सक, परिचारिका आणि आरोग्य सेविकांचा सत्कारही यावेळी करण्यात आला. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आणि आरोग्य विभागाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एचपीव्ही लसीकरण पूर्णपणे मोफत, ऐच्छिक, आणि पालकांच्या संमतीनं होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रं, ग्रामीण रुग्णालयं, जिल्हा रुग्णालयं, महानगरपालिका रुग्णालयं आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लसीकरण केलं जाईल. सर्व लाभार्थ्यांची नोंदणी आणि प्रमाणपत्र वितरण केंद्र शासनाच्या U-WIN या डिजिटल पोर्टलद्वारे केलं जाणार आहे.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या विजेतेपदासाठी, भारत आणि न्यूझीलंड यांच्यात अंतिम लढत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर सुरु आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. भारतानं जोरदार फटकेबाजी सुरु केली असून, शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १४ षटकात १ बाद १९१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेनला पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात पराभव पत्करावा लागला. चीनी तैपेईच्या लीन चून ई याने त्याचा १५-२१, २०-२२ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या पश्चिम बंगाल दौऱ्यात राजशिष्टाचाराच्या उल्लंघनाबाबत केंद्रीय गृहमंत्र्यांनी राज्य सरकारकडून स्पष्टीकरण मागवलं आहे. केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन यांनी राज्याच्या मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती यांना पत्र लिहून आपलं उत्तर सादर करायचे आदेश दिले आहेत. दरम्यान, राजशिष्टाचारांच्या उल्लंघनाला राज्य सरकार जबाबदार नसल्याचं मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या आहेत.

राष्ट्रपती ज्या कार्यक्रमाला येणार होते, त्याचं आयोजन खासगी आयोजक आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणानं केलं होतं, आयोजनात सरकारला सहभागी करुन घेतलं नव्हतं, तसंच या कार्यक्रमाची संपूर्ण माहिती राज्य सरकारला दिली नव्हती, त्यामुळे सरकारवर राजशिष्टाचाराच्या उल्लंघनाचा आरोप करणं योग्य नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं आहे.

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारची प्रतिमा मलीन करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोपही बॅनर्जी यांनी केला. या प्रकरणी राष्ट्रपतींवर कोणतीही राजकीय टिप्पणी करू नये, असे आदेश त्यांनी आपल्या पक्षातल्या सर्व नेत्यांना दिले आहेत.

<><><><><>

इस्त्रायलने आज दक्षिण लेबनॉनवर पुन्हा हल्ला केला असून या हल्ल्यात दोन सैनिकांसह १२ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याशिवाय बेरुतमध्ये एका हॉटेलवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात चार जण ठार तर १० जण जखमी झाले आहेत. आतापपर्यंतच्या लढाईत इराणमध्ये बाराशेहून अधिक, लेबनॉनमध्ये २९० हून अधिक आणि इस्त्रायलमध्ये ११ जणांचा मृत्यू झाला आहे. सहा अमेरिकन सैनिकांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

<><><><><>

नेपाळमध्ये ५ मार्च रोजी झालेल्या प्रतिनिधी मंडळाच्या निवडणुकांची मतमोजणी सुरु असून आतापर्यंत १५१ मतदारसंघांचे निकाल जाहीर झाले आहेत. राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीने ११९ जागांवर विजय मिळवला असून ६ जागांमध्ये ती आघाडीवर आहे. नेपाळी काँग्रेसने १७ जागा जिंकल्या आहेत, यूएमएल अर्थात संयुक्त मार्क्सवादी लेनिनवादी पक्षाने ७ जागा तर नेपाळी कम्युनिस्ट पक्षाने ६ जागा जिंकल्या आहेत. राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टीचे ज्ञान बहादूर शाही आणि अपक्ष उमेदवार मॅगसेसे पुरस्कार विजेते महाबीर पुन विजयी झाले आहेत. अनेक अपक्ष उमेदवारांना पुरेशी मत न मिळाल्यामुळे आपलं डिपॉझिट गमवावं लागल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे.

<><><><><>

मुंबई विद्यापीठाच्या नियोजित तृतीय वर्ष बीए, बीकॉम आणि बीएस्सी सत्र ५ चे सुधारीत वेळापत्रक आणि सत्र ६ च्या परीक्षांच्या सुधारीत तारखा विद्यापीठानं जाहीर केल्या आहेत. ज्या परीक्षा २७ ते ३० मार्च या कालावधीत होणार होत्या, त्या आता ९ एप्रिलपासून सुरु होणार आहेत. परीक्षांचं सुधारीत वेळापत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलं आहे.

//<><><><><>//